<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. ५</u> | <u>नि.दि.दा.क्र.७३/२०२३</u>

यादवराव विरुध्द मनोहर

मी शपथपूर्वक खरे सांगतो की | निशाणी – ६२

माझे नांव – संदिप भावरावजी वंजारी
वय – अंदाजे ५१ वर्ष, व्यवसाय – ग्रामसेवक, ग्रामपंचायत लिहीगाव व गादा
राहणार – नागपूर.

**सरतपासणी शपथेवर सुरु वादी तर्फे वकील श्री. गजवे यांच्या मार्फत**

मला साक्षीसाठी न्यायालयामध्ये येण्याबाबतचे समन्स मिळाले आहे. २०२० पासून माझ्याकडे गादा ग्रामपंचायतीचा अतिरीक्त कार्यभार आहे. हे म्हणणे खरे आहे की यादवराव दुधुके व ललीता दुधुके यांच्याकडून दि.१२.०७.२०२३ रोजी नोटीस पाठविण्यात आली होती, ती आम्हाला मिळाली होती. नोटीस मिळाल्यानंतर मी नोटीस मधील नमूद स्पोट वर भेट देण्यासाठी गेलो होतो. मी तेथे गेलो त्यावेळी तेथे बांधकाम सुरू होते व दुधुके व बावणे यांच्या घरामध्ये ४ ते ५ फूटाचे गल्ली होती. गल्लीमध्ये बावणे यांनी बांधकाम केले होते. साक्षीदाराने हातावर लिहीलेले नाव वाचून मनोहर बावणे असे सांगितले. बावणे यांचे बांधकाम सुरू होण्यापूर्वी मार्च किंवा एप्रिल २०२३ मध्ये मी घटना ठिकाणी गेलो होतो. दुधुके यांनी त्याबाबत तक्रार केली होती. त्या दोन घराच्या मध्ये खूली जागा असल्याचे मला दिसले होते. त्या खूल्या जागेचा वापर कशासाठी करत होते हे मला सांगता येणार नाही. दि.१२.०७.२०२३ ची नोटीस मिळाल्यानंतरही मी कोर्टात आलो होतो, मात्र बावणे यांच्य घरी गेलो नव्हतो. कोर्टाकडून मला नोटीस मिळाला होता. कोर्टाची नोटीस मिळाल्यानंतर मी बावणेच्या घरी गेलो नाही.

मला आता निशाणी २० कडील अनु.क्र. ४ चा कागद दाखविला. सदरचा दस्त हा गादा ग्रामपंचायतीकडील कर आकारणीची यादी चा उतारा आहे. सदरचा उतारा ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ४८ चा आहे. त्यावर भोगवटदार म्हणून मनोहर कुंजाराम बावणे यांचे नाव आहे. या उता–यावर खूली जागा असे मालमत्ता वर्णन कॉलम नं. ७ मध्ये नमूद आहे ती जागा पूर्व बाजूला आहे. मला खुल्या जागेच्या चर्तूसिमा सांगता येणार नाही. सदरच्या दस्तास **<u>निशाणी ६३</u>** देण्यात येते.

गादा गावात ३५ ते ३७ लोकांना पंतप्रधान आवास योजनेप्रमाणे घरे मंजूर झाली आहे. मनोहर बावणे यांनाही पंतप्रधान आवास योजनेप्रमाणे घरकूल मंजूर झाले होते. शासकीय नियमाप्रमाणे ३५० चौ.फूटाचे बांधकाम करण्यासाठी निधी दिला जातो मात्र लाभार्थी त्याचे स्व:जवळची रक्कम लावून त्या बांधकामामध्ये वाढ करून त्याच्या जागेत बांधकाम करू शकतो. आम्ही मनोहर बावणे यांना पंतप्रधान आवास योजनेमार्फत घरकूलाचा लाभ मिळाल्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही कारण त्यांना NMRDA कडून लाभ मिळाला. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला NMRDA चा अभियंता व ग्रामसचिव या दोघांनी परताडणी करून देण्याचा असतो. मनोहर बावणे यांचे बांधकाम पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र मी दिलेले आहे. बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र बांधकाम तपासून दिले नव्हते. माधवराव दुधुके यांनी दि. २६.१२.२०२२ रोजी बावणेच्या बांधकामाविरोधात तक्रार दिली होती का हे मला आता सांगता येणार नाही. मी कार्यालयातील अभिलेख पाहून त्याबाबत सांगू शकतो. सदरचा अभिलेख कार्यालयात उपलब्ध असल्यास मी तो न्यायालयात आणू शकतो. मी

सध्याच्या कालावधीत वादी – प्रतीवादीच्या घराजवळ तपासणी करायसाठी गेलो नव्हतो.

**सरतपास संपला.**

**उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री. पुडके यांच्यामार्फत सुरू**

हे म्हणणे खरे आहे की दि. १२.०७.२०२३ रोजीची नोटीस मिळाल्यानंतर मी स्पॉटवर गेलो नव्हतो, मी कोर्टात आलो होतो. हे म्हणणे खरे नाही की दुधुके व बावणे यांच्या घराच्या मध्ये ४ ते ५ फुटाची गल्ली असल्याचे मी खोटे सांगतो. मी दुधुके व बावणे यांच्या दोघांच्याही घराचे मोजमाप मी केले होते. ते मोजमाप मी कर आकारणी साठी २०२४–२५ साली केले आहे. ते बांधीव क्षेत्राचे केले आहे. हे म्हणणे खरे नाही की एप्रिल २०२३ मध्ये मी दावा मिळकतीवर गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यांच्या घराच्या मध्ये खूली जागा आहे हे पाहिल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ६३ मध्ये खूल्या जागेची चर्तूसिमा लिहीलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की यादवराव दुधुके यांच्या घराच्या समोर पक्का रोड आहे. हे म्हणणे खरे आहे की मनोहर बावणे यांच्या घराच्या समोरही पक्का रोड आहे. हे म्हणणे खरे आहे की या दोघांच्या समोर असलेल्या रस्त्यावरून लोक ये–जा करतात. दुधुके यांनी तक्रार दिल्यानंतर त्याची चौकशी केली होती का हे मला आता सांगता येणार नाही. मी ते अभिलेख पाहून सांगू शकतो. हे म्हणणे खरे नाही की वादीने साक्ष देण्यासाठी मला सांगितल्याने मी आज रोजी न्यायालयात हजर झालो .हे म्हणणे खरे नाही की मी वादीच्या सांगण्यानूसार साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.11.01 10:55:25 +0530

कामठी
दिनांक ०९/१०/२०२५

( एम.आर. कामत )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी